वरिष्ठ पोलीस निरीक्षक,
रफि अहमद किडवाई मार्ग पो.ठाणे,
शिवडी, मुंबई - ४०० ०१५.
Email ID : rakmargps@gmail.com

''सद्रक्षणाय खलनिग्रहणाय'' Email ID : ps.rakmarg.mum@mahapolice.gov.in दुरध्वनी क्र. ०२२-२४१८४३७५.

दिनांक : १६/१०/२०२५.

# प्रेस नोट

**जबरी चोरी गुन्हयाचा तपास करून आरोपी अटक केलेबाबत.**

नमूद गुन्हयाची थोडक्यात हकीकत अशी की, फिर्यादी नामे श्री. शामलाभाई होथीभाई रबारी, वय-३१ वर्षे, काम-खाजगी नोकरी, रा.ठी- ४ (१) ए, पहिला माळा, बॉम्बे कॉटन मिल इस्टेट, दत्ताराम लाड मार्ग, काळाचौकी मुंबई ३३ यांना दिनांक १३/१०/२०२५ रोजी दुपारी ०२.३० वा. ते २.५० वाजेच्या दरम्यान फिर्यादी यांची कंपनी मास्टरचैन ॲन्ड ज्वैल्स पत्ता युनिट नं १, गाळा नं ४ ए (१,२,३) पहिला माळा, बॉम्बे कॉटन मिल इस्टेट, दत्ताराम लाड मार्ग, मुंबई ३३ चे हॉलमार्क कामी क्वालिटी अस्साय ॲन्ड हॉलमार्क एलएलपी या कंपनीकडे देण्यात आलेले सोन्याचे दागिणे सदर कंपनीमधुन ताब्यात घेवून फॅक्टरीकडे परत जात असताना शिवडी कोर्ट शेजारील चौकाच्या पुढे दोनशे मिटर अंतरावर आर.ए.के चार रोड, झकेरीया बंदर रोड, शिवडी, मुंबई या ठिकाणी फिर्यादी यांच्या गाडीचा पाठलाग करणा-या वरील वर्णनाच्या इसमांनी फिर्यादी यांच्या गाडीला धक्का देवून त्यांना थांबण्यास भाग पाडले व सदर मोटार सायकलवरील मागील इसमाने त्याच्या जवळील पिस्टल जगदीश केराभाई आल याच्या दिशेने रोखून व पिस्टल हवेत फिरवून त्याच्या ताब्यातील काळया रंगाच्या बॅगेत ठेवलेले २०६७.१४३ ग्रॅम वजनाचे एकूण २,२९,४०,७०५.६८/-रु किंमतीचे सोन्याचे दागिणे बळजबरीने बॅगसहित घेवून मोटार सायकलवरून पळुन गेले म्हणुन फिर्यादी यांचा सविस्तर जबाब नोंद करून गु.र.क्र ३७२/२०२५ कलम ३०९(४), १२६(२), ३(५) भा.न्या.सं २०२३ सह कलम ३,२५ शस्त्र अधिनियम १९५९, सह कलम ३७ (१) १३५ महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

नमूद गुन्हा हा अतिशय गंभीर स्वरूपाचा असल्याने मा.अपर पोलीस आयुक्त मध्य प्रादेशिक विभाग, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-४ श्रीमती रागसुधा आर, तसेच सहा.पोलीस आयुक्त,माटुंगा विभाग, श्री सचिन कदम यांनी मार्गदर्शन करून सदरच्या गुन्हयाची व्यप्ती मोठी असल्याने सदरच्या गुन्हयाचा तपास वरिष्ठांनी वरिष्ठ पोलीस निरीक्षक, र.अ.कि.मार्ग पोलीस ठाणे,श्री विनोद तावडे हे करतील याबाबत आदेशित केले असल्याने सदरचा गुन्हयाची माहिती मिळताच घटनास्थळी र.अ.कि.मार्ग पो,ठाणे गुन्हे प्रकटीकरण पथक,ए.टी.सी.पथक, सायबर अधिकारी तसेच माटुंगा पोलीस ठाणे, सायन पोलीस ठाणे,ॲन्टॉपहिल पोलीस ठाणे व इतर पोलीस ठाणे येथील अधिकारी व अंमलदार यांच्या आठ टिम तयार करून घटनास्थळाचे सीसीटिव्ही तपासण्यात आले. मिळालेल्या माहितीच्या आधारे तांत्रिकरित्या माहिती गोळा करून त्यांचे अवलोकन करण्यात आले. तसेच तपासारदम्यान यातील सोन्याचे दागिन्यांचे काम करणाऱ्या दोन्ही कारखान्याचे/कंपनीचे अंदाजे २०० कर्मचारी यांचेकडे सखोल चौकशी करण्यात आली.

गुन्हयाच्या तपासादरम्यान मिळालेल्या माहितीच्या आधारे यातील पाहिजे आरोपीतांचे लोकेशन हे अदमदाबाद राज्य-गुजरात येथे असल्याचे निष्पण्ण झाल्याने त्याचा शोध घेणेकरीता मा.वरिष्ठांची परवानगी घेवून तात्काळ पोलीस पथक रवाना करण्यात आले. सदर ठिकाणी पथकाने जावून तेथे नमूद पाहिजे आरोपीतांचा शोध घेतला असता आरोपी नामे ०१) भानाराम भगराज रबारी, वय २१ वर्ष, धंदा सोने शॉप नोकरी, रा.ठी. गाव मैत्रीवाडा, ता. राणीवाडा, जिल्हा जाणोर, व ०२) लिलाराम नागजी देवासी, वय २१ वर्षे,

सोने शॉप नोकरी, मारूवाडा, ता.राणीवाडा, जिल्हा जालोर दोन्ही राज्य राजस्थान हे ओढव, अहमदाबाद राज्य गुजरात परिसरात मिळून आल्याने त्यांना ताब्यात घेवून ओढव पोलीस ठाणे, अहमदाबाद राज्य गुजरात येथे आणल्यानंतर त्यांच्याकडे केलेल्या गुन्हयाच्या अनुषंगाने विचारपुस करण्यात आली. सदर तपासामध्ये त्यांचा गुन्हयातील सहभाग निष्पन्न झाल्याने त्यांची अटकपुर्व वैदयकीय तपासणी करण्यात आली.

सदर आरोपींच्या अंगझडती दरम्यान गुन्हयातील चोरी केलेले सोन्याचे २१८० ग्रॅम वजनाचे ज्याची किंमत २,२९,४०,७०५/- रूपये किंमतीचे दागिने व त्यांचे गुन्हयात वापरते मोबाईल मिळुन आले. सदर मालमत्ता ताब्यात घेण्यात आले. नमूद आरोपीतांचा गुन्हयात सहभाग असल्याचे निष्पण्ण झाल्याने त्यांना गुन्हयाच्या पुढील तपासकामी रितसर अटक करण्यात आली. नमूद गुन्हयाच्या तपासादरम्यान यातील अटक आरोपीतांकडे केलेल्या चौकशीमध्ये असे निष्पण्ण झाले की, यातील अटक आरोपी, फिर्यादी जोगाराम मसरूराम देवासी उर्फ मोठा जगदीश, यांनी संगणमताने गुन्हयाचा कट रचून सदरचा गुन्हा केला असल्याचे निष्पण्ण झाल्याने नमूद फिर्यादी नामे श्री. शामलाभाई होथीभाई रबारी उर्फ शंकर, वय-३१ वर्षे, काम-खाजगी नोकरी, रा.ठी- ४ (१) ए, पहिला माळा, बॉम्बे कॉटन मिल इस्टेट, दत्ताराम लाड मार्ग, काळाचौकी मुंबई ३३ व जोगाराम मसरूराम देवासी उर्फ मोठा जगदीश, काम-खाजगी नोकरी, रा.ठी- ४ (१) ए, पहिला माळा, बॉम्बे कॉटन मिल इस्टेट, दत्ताराम लाड मार्ग, काळाचौकी मुंबई ३३ यांनाही नमूद गुन्हयामध्ये रितसर अटक करण्यात आली तसेच सदर गुन्हयामध्ये आरोपीताने फौजदारी कट रचल्याचे निष्पण्ण झाल्याने सदर गुन्हयामध्ये कलम ६१(२) भा.न्या.सं अन्वये वाढ करण्यात आली आहे. गुन्हयाच्या केलेल्या तपासावरून असे दिसून येते की सदर गुन्हयाची व्यप्ती मोठी असल्याने यातील अटक आरोपीतांकडे अधिक तपास करून गुन्हयाचा पुढील तपास करत आहोत.

**अटक आरोपीतांची नावे**

०१) भानाराम भगराज रबारी, वय २१ वर्ष, धंदा सोने शॉप नोकरी, रा.ठी. गाव मैत्रीवाडा, ता. राणीवाडा, जिल्हा जाणोर,

०२) लिलाराम नागजी देवासी, वय २१ वर्षे, सोने शॉप नोकरी, मारूवाडा, ता.राणीवाडा, जिल्हा जालोर

०३) श्री. शामलाभाई होथीभाई रबारी उर्फ शंकर, वय-३१ वर्षे, काम-खाजगी नोकरी, रा.ठी- ४ (१) ए, पहिला माळा, बॉम्बे कॉटन मिल इस्टेट, दत्ताराम लाड मार्ग, काळाचौकी मुंबई ३३

०४) जोगाराम मसरूराम देवासी उर्फ मोठा जगदीश, काम-खाजगी नोकरी, रा.ठी- ४ (१) ए, पहिला माळा, बॉम्बे कॉटन मिल इस्टेट, दत्ताराम लाड मार्ग, काळाचौकी मुंबई ३३

सदरची कामगीरी ही मा.अपर पोलीस आयुक्त मध्य प्रादेशीक विभाग श्री. विक्रम देशमाने सो., मा. पोलीस उप आयुक्त परिमंडळ ०४ श्रीमती रागसुधा, मा. सहा. पोलीस आयुक्त माटुंगा विभाग श्री सचिन कदम यांचे मार्गदर्शनाखाली तपासी अधिकारी वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री विनोद तावडे, र.अ.कि.मार्ग पोलीस ठाणे, तसेच तपासामध्ये मदत करणारे पो.नि.संजय परदेशी, गुन्हा दाखल अधिकारी पोउनि समाधान कदम, गुन्हे प्रकटीकरण अधिकारी श्री गोविंद खैरे, श्री महेश मोहिते व पथक, सायबर अधिकारी श्री योगेश खरात व ए.टी.सी.पथक तसेच सपोनि प्रदीप पाटील, सपोनि मदणे व सपोनि शेवाळे, पोउनि अमित कदम, सपोनि चौधरी व पोउनि नवले, पोउनि सुनिल पाटील व पोउनि भोसले, सपोनि खाडे, पोउनि प्रविण पाटील व इतर पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी यशस्वीपणे पुर्ण केली आहे.

( विनोद तावडे )
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
र.अ.कि.मार्ग पो,ठाणे,मुंबई